# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.03.2024** **वारः बुधवार**

---

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस
- नागपूर लोकसभा मतदारसंघासाठी कॉंग्रेसचे विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल; भाजपाचे उमेदवार नितीन गडकरी आज अर्ज भरणार.
- भारतीय जनता पार्टीतर्फे चंद्रपुरात सुधीर मुनगंटीवार, तर गडचिरोली–चिमूरमध्ये अशोक नेते यांचा उमेदवारी अर्ज दाखल
- महायुतीचं 99 टक्के जागावाटप निश्चित, उद्या जागावाटप आणि उमेदवार जाहीर होणार असल्याची अजित पवारांची घोषणा आणि
- मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक रद्द.

---

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस आहे. या पहिल्या टप्प्यात राज्यातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली- चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये 19 एप्रिलला मतदान होणार आहे. उद्या 28 मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल आणि 30 मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.

या पाच लोकसभा मतदासंघात काल अखेर 40 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघासाठी 11, रामटेकसाठी 6, चंद्रपूरसाठी 7, भंडारा-गोंदियासाठी 4 आणि गडचिरोली-चिमूरसाठी 2 अशा 30 उमेदवारांनी हे अर्ज दाखल केले आहेत.

नागपूर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे कॉंग्रेसचे विकास ठाकरे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केला. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, यांच्यासह पक्षाचे विविध नेते तसंच महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेतेही यावेळी उपस्थित होते. त्याआधी नागपुरातील संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅली काढण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील पाचही जागा महाविकास आघाडी जिंकेल, असा विश्वास नाना पटोले यांनी यावेळी व्यक्त केला.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि नागपूर लोकसभा मतदार संघाचे भाजपाचे उमेदवार नितीन गडकरी आज आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

चंद्रपूर मतदार संघासाठीचे भाजपाचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार आणि गडचिरोली-चिमूर मतदार संघासाठीचे भाजपा उमेदवार अशोक नेते यांनीही काल अर्ज भरला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अन्य नेते यावेळी उपस्थित होते. यावेळी झालेल्या सभेला त्यांनी संबोधित केलं. आपण नेहमीच विकासाचं राजकारण केलं असून जनता मतांच्या रूपानं आपला आशीर्वाद देईल, असा विश्वास मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. लोकसभेच्या निवडणुकीत भाजपा विरुद्ध कॉंग्रेस असा संघर्ष नसून, ही नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी लढाई आहे, असं प्रतिपादन देवेंद्र फडणवीस यांनी

गडचिरोली इथं केलं. आगामी काळात गडचिरोली जिल्हा उद्योगात सर्वांत अग्रेसर जिल्हा असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

रामटेक लोकसभा मतदार संघात आतापर्यंत 7 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.
गडचिरोली-चिमूर मतदारसंघात काँग्रेसचे नामदेव किरसान निवडणूक लढवणार आहेत. किरसान यांच्या उमेदवारीमुळे नाराज होऊन माजी आमदार आणि गेल्यावेळेचे लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. नामदेव उसेंडी यांनी काल आदिवासी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी नागपूरात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला.

**अजित पवार**

महायुतीचं 99 टक्के जागावाटप निश्चित झालं असून गुरुवारी जागावाटप आणि उमेदवार यादी जाहीर होईल; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबरच्या संयुक्त पत्रकार परिषदेत याची घोषणा करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. रायगडमधून प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेच महायुतीचे उमेदवार असतील अशी घोषणाही त्यांनी केली. पक्षाच्या आमदार आणि मंत्र्यांची बैठक घेतल्यानंतर ते काल पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. या बैठकीत बारामती, शिरूर, सातारा, धाराशिव, नाशिक, रायगड आणि परभणी लोकसभा मतदारसंघांविषयी चर्चा झाल्याची त्यांनी सांगितलं.
दरम्यान शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी अजित पवार, सुनिल तटकरे, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. यावेळी अजित पवार यांनी आढळराव पाटील यांना शिरुरमधून उमेदवारी जाहीर केली.

**पोटनिवडणूक रद्द**

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं काल रद्द केली. भाजपा आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी 16 मार्चला पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली होती. त्याविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या पोटनिवडणुकीत निवडून येणाऱ्या उमेदवाराला पुरेसा कालावधी मिळत नसल्याचा मुद्दा या याचिकेत मांडला होता. नवीन सदस्याला निवडून आल्यावर फक्त चार महिन्याचा कालावधी मिळणार होता. नियमानं तो कमीत कमी सहा महिने मिळायला हवा. हे मान्य करत न्यायालयानं ही पोटनिवडणूक रद्द केली.

**मतदान सुट्टी**

राज्यात पाच टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. यासंदर्भातील शासन परिपत्रक राज्य शासनानं काल जारी केलं. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळं, कंपन्या आणि संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. सुट्टी किंवा सवलत न मिळाल्यामुळे मतदान करू न शकल्याची तक्रार आल्यास, संबंधितांविरोधात योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचंही या आदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.....**

**पुस्तिका प्रकाशन**

पुणे जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीनं तयार करण्यात आलेल्या निवडणूक पूर्वपीठिकेचं प्रकाशन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या हस्ते काल पुण्यात झालं. माध्यमांना निवडणूक विषयक संदर्भांसाठी ही पुस्तिका उपयुक्त ठरणार आहे. 1951 ते 2019 या दरम्यानच्या, जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघातल्या निवडणुकीच्या ठळक वैशिष्ट्यांचा या पुस्तिकेत समावेश आहे.

माध्यमांच्या माहितीसाठी जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांचे समन्वय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक, मतदार मदत कक्ष, जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक, आयोगाचे विविध ॲप पोर्टल आदींची माहितीही यात देण्यात आली आहे.

**आयुक्त निर्देश**

महसूल आणि पोलीस प्रशासनानं परस्पर समन्वयानं निवडणुकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना कराव्या आणि निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठीचं नियोजन करावं, असे निर्देश पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. पुणे विभागाची निवडणूक आढावा बैठक काल दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती; त्यावेळी ते बोलत होते. आदर्श आचारसंहिता आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. युवक आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करावं, पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्याबरोबरच मतदारांना त्यांचं मतदान केंद्र शोधण्याविषयी व्यापक जनजागृती करावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी तसंच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रांना भेट देऊन तिथल्या समस्या जाणून घ्याव्या असे निर्देशही यावेळी आयुक्तांनी दिले. निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक कार्यवाहीवर विशेष लक्ष देण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**जिल्हाधिकारी**

निवडणूकीसाठी सर्व यंत्रणांनी समन्वयनं काम करावं असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी आणि रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिले आहेत. ते काल रत्नागिरीत पत्रकार परिषदेत बोलत होते. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदार संघात एकही संवेदनशील मतदानकेंद्र नसल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**लोकशाहीदिन**

आचारसंहिता काळात लोकशाही दिनाचं आयोजन होणार नाही असं साताऱ्याचे निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी कळविले आहे. लोकसभा निवडणूकांची आचारसंहिता येत्या 6 जून पर्यंत लागू राहणार आहे.

**तुकारामबीजसोहळा**

संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज यात्रेनिमित्त आज देहूमध्ये श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीनं विविध कार्यक्रम होणार आहेत. काकड आरती, श्रींची महापूजा आणि श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर पूजा झाल्यावर सहा वाजता वैकुंठस्थान मंदिरातील संत तुकाराम महाराज महापूजा होणार असून साडेदहा वाजता महाराजांच्या पालखीचं प्रस्थान वैकुंठस्थान मंदिराकडे होणार आहे. तुकाराम बीजेनिमित्त मंदिराला रोषणाई करण्यात आली आहे.

**निधन**

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते ॲडवोकेट माणिकराव येवले यांचं काल सकाळी नांदेड इथं वृद्धापकाळानं निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 1956 च्या ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळ्यात त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला; डॉक्टर बाबासाहेबांच्या महानिर्वाण समयी चैत्यभूमीतल्या उपस्थितीनंतर माणिकराव येवले आयुष्यभर आंबेडकरी चळवळीचा झंजावात होऊन फिरले. राज्य शासनाने त्यांना मुख्यमंत्री वसंतराव नाईक समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवलं आहे. विविध देशांमध्ये झालेल्या जागतिक बौद्ध परिषदेत त्यांनी प्रतिनिधीत्व केलं होतं.

**हवामान**

राज्यात बहुतांश ठिकाणी पारा चाळीस अंशांच्या आसपास आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आज ढगाळ हवामान राहील. रात्रीच्या वेळी उष्ण हवामान राहण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

---

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**